तक्रार युएलपी क्र.२१/२०२४
निशाणी क्रं. यू—८

**विपतर्फे ॲड. श्री.डी.एस. देसाई यांचेमार्फत तक्रारदारा यांचा उलटतपास शपथेवर सुरु**

मी विप दुध संघात असिस्टंट मार्केटींग ऑफिसर म्हणून नोकरीस लागलो. दिनांक ०६/०७/२०२२ रोजी माझी बदली पशूखाद्य विभाग पंचतारांकीत औद्योगिक वसाहत, कागल येथे झाली. हे म्हणणे खरे नाही की, मी मार्केटींग विभागाचा प्रमुख म्हणून काम करीत होतो. माझे वरीष्ठ अधिकारी व्ही.डी.पाटील हे होते. मार्केटींग विभागात माझे वरीष्ठ अधिकारी नव्हते. हे म्हणणे खरे आहे की, मार्केटींग विभागात माझे अधिपत्याखाली आणि नियंत्रणाखाली काम चालत होते. माझे विभागत सहकारी दुध संस्थांना पशूखाद्य पुरवणे, ट्रक लोड तयार करणे, संस्थेला पशूखाद्य वेळेत पोहोच होते किंवा कसे याची पाहणी करणे इ. कामे मी करत होतो. संबंधीत संस्थेचे सचिव फोन व्दारे पशूखाद्याची मागणी मार्केटींग विभागाकडे करत होते. हे म्हणणे खरे आहे की, पशूखाद्याच्या मागणीची पुर्तता मी करत होतो. पशूखाद्य वाहतूकीसाठी विप संघा तर्फे वाहतूक ठेकेदार नेमले होते. वाहतूक ठेकेदार निवीदेव्दारे नेमले जात होते. संचालक मंडळ वाहतूकीचे टप्पे पाहून कमी दरातील निवीदा मंजूर करत होते. निवीदा मंजूर झाल्यानंतर वाहतूक ठेकेदारासोबत करार होत होता. सदर करारामध्ये वाहतूकीचा दर, टप्पे नमूद असत. ठेकेदार या सहकारी संस्था असायच्या. हे म्हणणे खरे आहे की, पशूखाद्याची वाहतूक झाल्यास त्याची नोंद मार्केटींग विभागाकडे संगणकाव्दारे असायची. वाहतूक संस्थेचे वाहतूकीचे बील दर १५ दिवसांनी अशी महिन्यातून दोन वेळा मागणी प्रमाणे अदा केली जायची. वाहतूकीचे बील संबंधीत ठेकेदाराकडून मार्केटींग विभागाचे क्लार्क श्री. शुभम भोसले यांच्याकडे जमा केले जात होते. स्वत: शुभम भोसले वाहतूकीचे बील, किलोमीटरचे टप्पे आणि दर तपासत होते. हे म्हणणे खरे आहे की,

शुभम भोसलेने तयार केलेली समरी माझेकडे मंजूरीसाठी यायची. हे म्हणणे खरे नाही की, मी वरीष्ठ म्हणून समरी मधील नोंदीची तपासणी आणि खात्री करून सही करत होतो. हे म्हणणे खरे आहे की, शुभम भोसलेने तयार केलेली समरी तपासून खात्री करून वरीष्ठ म्हणून मी ती संबंधीत विभागाकडे पाठवत होतो. हे म्हणणे खरे आहे की, माझेकडील तपासणी आणि खात्री केलेली समती अकौंट विभागाचे क्लर्क निलेश भोसले यांच्याकडे जात होती.

**विपच्या विधीज्ञांच्या तोंडी विनंतीवरून उलटतपास पुढील तारखेपर्यंत तहकूब.**

श्रवणोत्तर स्विकृत,

**सही/—**

( के. बी. कामगौडा )
न्यायाधीश,
कामगार न्यायालय क्र. २ कोल्हापूर.

कोल्हापूर.
दिनांकः—२५/०२/२०२६